Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -314 | THURSDAY DT.15 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष –०३ | अंक –३१४ | गुरूवार,दि.१५ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रु | । पाने ४




दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




• बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955



# मनोज जरांगे उपोषणावर ठाम

मराठा समाजाच्या विविध मागण्यांसंदर्भात चर्चा करण्यासाठी २० फेब्रुवारी रोजी विधिमंडळाचे एकदिवसीय विशेष अधिवेशन बोलाविण्यास राज्य मंत्रिमंडळ बैठकीत आज मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. शिवजयंतीच्या मुहूर्तावर विशेष अधिवेशन घेऊन मराठा आरक्षणाची घोषणा करण्यास मुख्यमंत्री आग्रही होते.मात्र शिवजयंतीला मतदारसंघांमध्ये नियोजित कार्यक्रम असल्याने अधिवेशनासाठी मुंबईत थांबणे गैरसोयीचे होईल, असा सूर बैठकीत लावण्यात आला. त्यामुळे शिवजयंतीला रायगडावरील कार्यक्रमात मराठा आरक्षणाची घोषणा करून दुसऱ्या दिवशी विशेष अधिवेशन घेतले जाणार आहे.

वडीगोद्री (जि. जालना) : ''मी वैद्यकीय उपचार घेणार नाही. मला झोपेत सलाईन लावू नका. सलाईन लावायचे असेल तर अगोदर अंमलबजावणी कधी करता ते सांगा. मायबाप समाज तुम्ही सरकारला धारेवर धरा. मी एकटा मुंबईत जाऊन बसेन. अंमलबजावणी झाल्याशिवाय उठणार नाही. सरकारने त्वरित निर्णय घ्यावा. अंत पाहू नका. मी जर मेलो तर मला तसेच शासनाच्या दारात नेऊन टाका,'' असे मनोज जरांगे यांनी बुधवारी (ता. १४) अंतरवाली सराटी येथे उपस्थित मोठ्या जनसमुदायाला सांगितले. यावेळी जरांगे यांनी त्यांना लावलेली सलाईन काढून फेकून दिली.

राजपत्रित अध्यादेश व मसुदा यांची अंमलबजावणी करावी, अधिवेशन घेऊन 'सगेसोयऱ्या'बाबत कायदा मंजूर करावा, यासाठी शनिवारपासून (ता.१०) मनोज जरांगे अंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषण करत आहेत.

## रायगडावरून होणार घोषणा; अधिवेशन २० ला

# महाराष्ट्र बंदला बीड जिल्हयात प्रचंड प्रतिसाद







गेवराई |बीड

मराठा आरक्षण बाबतच्या विविध मागण्या संदर्भात बुधवारी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती. त्या अनुषंगाने काल बुधवार रोजी गेवराई शहरात सकाळपासूनच बंद पाळण्यात आला. सकल मराठा समाज बांधवाकडून शहरात मोटारसायकल रॅली काढत व्यापा-याना बंद चे आवाहन करण्यात आले. व्यापा-यांनी देखील या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपपले व्यवहार बंद ठेवले. तर गेवराई पोलीसांनी देखील खबरदारीचा उपाय म्हणून शहरात ठिकठिकाणी सकाळपासूनच तगडा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. मराठा योद्धा मनोज जरांगे यांचा आज उपोषणाचा सहावा दिवस असुन काल त्यांची प्रकृती खुपच खालावली आहे. मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा म्हणुन शहरातील व्यापाऱ्यांनी दिवसभर आपल्या दुकानाची शटर डाऊन करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.तालुक्याचे भूमिपुत्र तथा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सरसकट आरक्षण मिळावे या मागणीसाठी राज्यभर लढा उभारला आहे.त्याचा परिणाम म्हणजे राज्य सरकारने अधिसूचना जारी केली आहे.परंतु या अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी सरकार वेळकाढू धोरण अवलंबत असल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला आहे.अधीसुचनेचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी सरकारने लवकरात लवकर विशेष अधिवेशन बोलावून समाजाला सरसकट आरक्षण देण्याची प्रक्रिया पार पाडावी म्हणून मनोज जरांगे पाटील हे आमरण उपोषणाला बसले आहेत.त्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा म्हणुन शहरासह तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला आहे.व्यापारी वर्गाने देखील आपल्या व्हॉट्स प ग्रूपवर बंद पाळण्याचे आवाहन केले होते.त्यानुसार संपूर्ण बाजारपेठेत दिवसभर शुकशुकाट पहायला मिळाला.या आंदोलनात मराठा समाजबांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

## पूस जगमित्र कारखाना

# मुंजा गित्ते प्रकरणातून कृषिमंत्री धनंजय मुंडे, वाल्मिक कराड, सूर्यभान मुंडे दोषमुक्त

### अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी अंबाजोगाई यांचा निकाल

## मुंजा गित्ते प्रकरणी धनंजय मुंडेंची बदनामी करणाऱ्यांना कायद्याची चपराक!

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याशी संबंधित असलेल्या पूस ता.अंबाजोगाई येथील जगमित्र साखर कारखान्यासाठी मुंजा गित्ते यांच्या जमीन खरेदी बाबत दाखल झालेल्या दोषारोपपत्रातून न्यायालयाने धनंजय मुंडे, वाल्मिक अण्णा कराड तसेच सूर्यभान नाना मुंडे यांना दोषमुक्त केले आहे. अंबाजोगाई अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी यांनी या प्रकरणात धनंजय मुंडे, वाल्मिक अण्णा कराड किंवा सूर्यभान मुंडे यांच्या विरोधात कोणताही पुरावा नसल्याने तिघांनाही या प्रकरणातून दोषमुक्त केले आहे. मुंजा गित्ते नामक एका शेतकऱ्याने पूस कारखान्यासाठी कमी पैश्यात जमीन बळकावली, ४० लाखांचे धनादेश वटले नाही, नोकरी लावण्याचे आश्वासन दिले असे विविध आरोप



फिर्यादीने केले होते. मुंजा गित्ते व अन्य काही शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून २०१८ साली बरदापुर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी याबाबत तपास करून अंबाजोगाई न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. ते सर्व आरोप कोणताही पुरावा नसल्याने न्यायालयाने फेटाळून लावले, मात्र मागच्या काही वर्षात धनंजय मुंडे व त्यांच्या सहकाऱ्यांना या प्रकरणावरून नाहक बदनामी सहन करावी लागली.अखेर धनंजय मुंडे यांनी मुंजा गित्ते प्रकरणातील लढाई न्यायालयात जिंकली असून, त्यांच्या वतीने ऍड.अशोक कवडे यांनी काम पाहिले. दरम्यान या प्रकरणाचा आधार घेत नाहक बदनामी करणाऱ्यांना कायद्याची चपराक बसली आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.




## दहिवाळ सुवर्णकार या सुवर्णदालनाचे आज नवीन जागेत स्थलांतर व शुभारंभ

**बीड (प्रतिनिधी)**

**गेल्या अनेक वर्षांपासून शुद्ध सोने, अप्रतिम कलाकुसर, विश्वासाची परंपरा या यशाच्या मंत्राने लोकांना प्रामाणिक सेवा देत यशस्वी वाटचाल करीत असलेले आधुनिक, पारंपरिक शुद्ध सोने व दागिन्यांचे दहिवाळ सुवर्णकार या सुवर्णदालनाचे नवीन जागेत स्थलांतर व शुभारंभ आज गुरुवार दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता संपूर्ण होत असल्याची माहिती दहिवाळ सुवर्णकार या सुवर्ण दालनाचे संचालक जनार्दन जगन्नाथराव दहिवाळ यांनी दिली आहे.**

दीप सुभाष रोड येथे असलेल्या दहिवाळ सुवर्णकार या सुवर्णदालनाच्या शाखेचे आशापुरा कॉम्प्लेक्स, डीपी रोड, सारडा नगरी जवळ, बीड येथे आज स्थलांतर होत आहे. बुधवार दि. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी सदरील कार्यक्रम संपन्न होणार होता मात्र मराठा आरक्षणाच्या प्रश्नासाठी महाराष्ट्र बंद पुकारण्यात आल्याने एक दिवसा करिता दहिवाळ सुवर्णकार या सुवर्णदालनाचे स्थलांतर व शुभारंभाचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे.

आज गुरुवार दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी दहिवाळ सुवर्णकार या सुवर्ण दालनाचे स्थलांतर व शुभारंभाचा कार्यक्रम सकाळी ११ वाजता श्री ज्ञानेश्वर माऊली संस्थान उत्तरेश्वर पिंपरी येथील ह. भ. प. परम पूज्य नारायण महाराज गिरी, अश्वलिंग संस्थान पिंपळवंडी येथील ह. भ. प. परमपूज्य महादेवनंद भारती, श्री ज्ञानेश्वर माऊली संस्थान चाकरवाडीचे ह. भ. प. परमपूज्य महादेव महाराज गिरी या संतमंतांच्या शुभहस्ते आशापुरा कॉम्प्लेक्स, डीपी रोड, सारडा नगरी जवळ, बीड येथे संपन्न होत आहे. तरी याप्रसंगी अल्पोपहार व पानसुपारीच्या कार्यक्रमास आणि उद्घाटनास उपस्थित राहावे असे आवाहन दहिवाळ सुवर्णकार या सुवर्णदालनाचे संचालक जनार्दन दहिवाळ, चंद्रसेन दहिवाळ, ड. राम दहिवाळ, करणकुमार दहिवाळ, पवनकुमार दहिवाळ, लखनकुमार दहिवाळ, मदनकुमार दहिवाळ आदींनी केले आहे.

# आडस प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा

## आ. नमिता मुंदडांच्या चार वर्षांच्या पाठपुराव्याला यश

### बनसारोळा, विडासाठीही प्रयत्न सुरु

आडस सोबतच बनसारोळा आणि विडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दर्जावाढीसाठी आ. नमिता मुंदडा यांचे चार वर्षापासून शासन दरबारी प्रयत्न सुरु असून अनेकदा पत्रव्यवहार झाले आहेत. त्यापैकी सध्या आडस केंद्राचे श्रेणीवर्धन करण्यात यश आले असून नजीकच्या काळात लवकरच बनसारोळा आणि विडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन होईल, त्यासाठी जोमाने प्रयत्न सुरु आहेत असे आ. नमिता मुंदडा यांनी आश्वस्त केले आहे.

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

केज तालुक्यातील आडस येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी केज प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जावाढ करण्यासाठी पाठपुरावा केला होता. या निर्णयाने आडस प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या ग्रामीण भागात चांगली आरोग्यसेवा मिळणे शक्य होणार आहे.

आडस ही केज तालुक्यातील महत्वाची बाजारपेठ असून उच्च दर्जाच्या शेळ्यांसाठी प्रसिद्ध आहे. आजूबाजूची वीस पेक्षाही अधिक खेडी या बाजारपेठेवर अवलंबून असल्याने येथे वर्दळ असते. त्यासोबतच येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज २०० ते ३०० रुग्ण उपचारासाठी येत असतात. आडस परिसरात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे; मात्र त्या प्रमाणात तिथे नागरिकांना आरोग्याच्या सुविधा मिळत नव्हत्या. आजारी व अपघातग्रस्त व्यक्तींना अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात घेऊन जावे लागते. हे अंतर दूरवर असल्यामुळे अनेक रुग्णांनी वेळेत उपचार न मिळाल्याने प्राण गमावलेले आहेत. त्यामुळे या भागासाठी ग्रामीण रुग्णालयाची नितांत आवश्यकता होती. हि बाब लक्षात घेत आ. नमिता मुंदडा यांनी मागील चार वर्षापासून आडस प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी राज्य शासनाकडे करून त्यासाठी पाठपुरावा सुरु ठेवला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून राज्य शासनाने आडस येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जावाढ करण्याचा निर्णय घेतला असून लवकरच या ठिकाणी आता तीस खाटांचे ग्रामीण रुग्णालय होणार आहे. त्यामुळे आडस आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागाला चांगली आरोग्यसेवा मिळणे शक्य होणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री तानाजी सावंत, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे, बीडच्या खासदार प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.



संपादकीय

## काँग्रेसचा अशोकवनवास

अशोक चव्हाण यांचा जन्मच काँग्रेसमध्ये झाला. वडील शंकरराव हे स्वातंत्र्यसैनिक, निजामविरोधी चळवळीतील योद्धे आणि उत्तम प्रशासक. अशोकरावांच्या रक्तातून काँग्रेस वाहात असल्यानेच त्यांनी भाजप प्रवेशाच्या पत्रकार परिषदेत आशिष शेलार यांचा उल्लेख 'मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष' असा केला. हे जिव्हाचांचल्य म्हणजे 'स्लीप ऑफ टंग' असले तरी त्यातून एक शोकांतिका झिरपत होती

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे काँग्रेस सोडून भारतीय जनता पक्षात जाणार, ही अनेक महिने चाललेली चर्चा अखेर खरी ठरली. राहुल गांधी यांची 'भारत जोडो यात्रा' मराठवाड्यात आली; तेव्हा अशोक चव्हाण यांनी सारी ताकद पणाला लावली. नांदेडची सभा यशस्वी झाली. मात्र, ती सभा आणि यात्रा ही पक्षाच्या नवभरारीची चाहूल न ठरता अशोक चव्हाण यांनी पक्षाला दिलेली निरोपाची पार्टी ठरली आहे. महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचे बालेकिल्ले तोफा लावून उद्ध्वस्त केले जात असताना काँग्रेसचीच गढी तेवढी शाबूत राहिली होती. तीही आता ढासळते आहे. अशोक चव्हाण यांचा जन्मच काँग्रेसमध्ये झाला. वडील शंकरराव हे स्वातंत्र्यसैनिक, निजामविरोधी चळवळीतील योद्धे आणि उत्तम प्रशासक. अशोकरावांच्या रक्तातून काँग्रेस वाहात असल्यानेच त्यांनी भाजप प्रवेशाच्या पत्रकार परिषदेत आशिष शेलार यांचा उल्लेख 'मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष' असा केला. हे जिव्हाचांचल्य म्हणजे 'स्लीप ऑफ टंग' असले तरी त्यातून एक शोकांतिका झिरपत होती. अशोक चव्हाण यांना काँग्रेस सदस्यत्वाच्या राजीनाम्याचे पत्र लिहिण्याआधी निश्चितच रात्रभर झोप लागली नसणार. पण देशभरातल्या ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांची झोप जशी भाजपने उडविली आहे; त्याहीपेक्षा ती काँग्रेस नेतृत्वानेच उडविली आहे. पक्षाला धड दिशा नाही. युद्धमान सातत्य नाही. गटबाजीला विराम नाही. भविष्याचा वेध नाही. मित्रपक्षांशी संवाद नाही आणि विजयाचा ध्यास नाही. तरीही या पक्षात निष्ठेने उत्तरायण घालविणारे पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारखे नेते आहेत. अर्थात, ज्या नेत्यांच्या पुढील पिढ्यांना राजकीय कारकीर्द खुणावते आहे; त्यांना काँग्रेसमध्ये राहण्यात राम वाटत नाही. तसाही राम तिकडेच आहे. चव्हाण यांच्या घरातही डायनिंग टेबलवर काँग्रेस की भाजप असा टॉस झाला नसेलच, असे नाही. दरवेळी, केंद्रीय यंत्रणांच्या धाकामुळेच नेते पक्ष सोडत नाहीत. अशोक चव्हाण यांनी पक्षत्याग केल्यावर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी त्यांना निष्ठेची आठवण दिली. इतका दुसरा विनोद नसेल. हे स्वत: भाजपमध्ये जाऊन परत आलेले. ज्येष्ठ नेत्यांशी संवाद राखण्यात पुरते अपयश येणारे. काँग्रेसचे 'मोहब्बतचे दुकान' यांना राज्यात चालवायचे आहे की ते बंद करून चावी दिल्लीतल्या जोडगोळीकडे नेऊन द्यायची आहे, अशी शंका येणारे. असे नेतृत्व असल्यावर किती नेत्यांना मेहनत करून पक्ष टिकवावासा आणि वाढवावासा वाटेल?

महाराष्ट्रात राज्यसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. सहापैकी तीन भाजप, एक शिंदे सेना, एक अजित काँग्रेस आणि एक काँग्रेस असे ताकदीनुसार वाटप होते. आता अशोक चव्हाण भाजपचे राज्यसभेचे उमेदवार झाल्यानंतर त्यांचे किती समर्थक व इतरही काँग्रेस आमदार 'क्रॉस व्होटिंग' करणार, हा कळीचा मुद्दा आहे. काँग्रेसचे विधानसभेत ४४ आमदार होते. यातल्या १२ ते १५ आमदारांनी पक्षादेश मानला नाही तर काँग्रेसचा उमेदवार पडून भाजपचे चार खासदार येऊ शकतात. तसेच, ही राज्यातील काँग्रेसमधील फुटीची नवी सुरुवात असेल. भाजपने चव्हाण यांना मतांचा कोटा देतानाच त्यांच्यावर या अतिरिक्त फुटीर मतांचीही जबाबदारी टाकली असणार. राज्यात शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस फुटल्यावर विरोधकांमधील काँग्रेसचा अवकाश-स्पेस वाढला होता. विधानसभेत विरोधी पक्षनेतेपद आले होते. ही मोठी संधी होती.

# अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी, डॉ. अजीत गोपछडे यांना भाजपाकडून राज्यसभेची उमेदवारी

मुंबई ।प्रतिनिधी

महायुतीने राज्यसभेसाठी चार उमेदवारांची घोषणा केली आहे. यात भाजपाने महाराष्ट्रातील राज्यसभेसाठी तीन जणांना उमेदवारी दिली आहे. अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी आणि डॉ. अजीत गोपछडे यांना भाजपाने उमेदवारी दिली आहे. भाजपाकडून याबाबत आज अधिकृत यादी जाहीर करण्यात आली. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मिलिंद देवरा यांना राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून अद्याप उमेदवारी जाहीर झाली नाही.अशोक चव्हाण आणि अजीत गोपछडे हे दोन्ही नेते नांदेडमधील आहेत. अशोक चव्हाण यांनी मंगळवारी भाजपामध्ये प्रवेश केला होता. त्यावेळी त्यांना राज्यसभेची उमेदवारी मिळेल, अशी चर्चा झाली होती. याबाबत आज भाजपाकडून अधिकृत माहिती देण्यात आली.

अजीत माधवराव गोपछडे हे मूळचे नांदेड येथील आहेत. लिंगायत ओबीसी समाजाचे अजीत गोपछडे यांनी संघ प्रचारक म्हणून काम केले आहे. त्याशिवाय ते कारसेवक आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षात डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यरत असलेल्या बालरोगतज्ज्ञ डॉ. अजित गोपछडे यांना भाजपकडून राज्यसभेची संधी मिळाली आहे. नांदेडमध्ये लोकसभा आणि नांदेड तसेच नायगाव विधानसभेसाठी नेहमीच चर्चेत राहिलेल्या डॉ. गोपछडे यांना अखेर पक्षनिष्ठेचे फळ मिळाले आहे.

डॉ. गोपछडे यांचे मूळ गाव कोल्हे बोरगाव (ता. बिलोली) असून त्यांचे वडील प्रा. माधवराव गोपछडे तर काका प्राचार्य गोविंदराव गोपछडे आहेत. गोपछडे कुटुंब नेहमीच सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात अग्रेसर असून या संस्कारक्षम कुटुंबात जन्म घेतलेल्या डॉ. गोपछडे यांचे बारावीचे शिक्षण नांदेडला यशवंत महाविद्यालयात झाले. त्यानंतर त्यांनी एमबीबीएस औरंगाबादच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तर पदव्युत्तर शिक्षण (बालरोगतज्ज्ञ) अंबेजोगाई (जि. बिड) येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात झाले.महाविद्यालयात असताना त्यांनी मार्डच्या चळवळीचे नेतृत्व केले. त्याचबरोबर प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे तसेच नितीन गडकरी यांच्या संपर्कातून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतही काम केले. त्यानंतर नांदेडला आल्यावर त्यांनी अमृतपथ बालरुग्णालय सुरु केले. पत्नी डॉ. चेतना गोपछडे या देखील स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत. नांदेडला सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या डॉ. गोपछडे यांनी अनेक उपक्रम राबवले. त्याचबरोबर गुरुगोविंदसिंघजी रक्तपेढी सुरु करण्यातही त्यांचा मोठा वाटा होता. चंद्रकांत पाटील यांना पुण्यातील कोथरुडमधून आमदारकीला उतरवल्यामुळे मेधा कुलकर्णी नाराज होत्या. त्यांनी आपली नाराजी अनेकदा बोलून दाखवली होती. आता त्यांना राज्यसभेची उमेदवारी देत नाराजी दूर करण्यात आली आहे.



महाराष्ट्रात राज्यसभेच्या सहा जागांची निवडणूक होत आहे. या सहा जागा लढवण्याची महायुतीने जय्यत तयारी सुरु केली होती. अशोक चव्हाण भाजपामध्ये दाखल झाल्यामुळे याला आणखी बळ मिळाले होते. मंगळवारी रात्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यामध्ये जवळपास अडीच तास चर्चा झाली. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांना एक एक जागा मिळणार होती. तर भाजपाने चौथ्या जागेसाठी तयारी सुरु केली होती. पण चर्चेनंतर सध्या मतांची जुळवाजुळव करणे कठीण असल्याचे दिसल्यामुळे भाजपाने चौथा उमेदवार देण्याचे टाळले आहे. भाजपाकडून चौथा उमेदवार न दिल्यामुळे राज्यसभा निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता आहे.

---

**मा. श्रीमती पी डी चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क, स्तर, बीड यांच्या न्यायालयात,**
**किरकोळ दिवाणी अर्ज २६७/२०२४**
**सुनिता प्र. दादाराव जोगदंड व इतर विरुध्द निरंक**
**अर्जदार:-**
**१. सुनिता भ्र. दादाराव जोगदंड, वय-५८ वर्षे, धंदा-घरकाम रा. जैताळवाडी, ता. जि. बीड**
**२. पुजा पि. दादाभाऊ उर्फ दादाराव जोगदंड, वय-२३ वर्षे, धंदा-शिक्षण रा. जैताळवाडी, ता. जि. बीड**
**३. मनिषा पि. दादाभाऊ उर्फ दादाराव जोगदंड, वय-२१ वर्षे, धंदा-शिक्षण रा.जैताळवाडी, ता. जि. बीड**
**४. सोनाली पि. दादाभाउ उर्फ दादाराव जोगदंड, वय-१९ वर्षे, धंदा-शिक्षण रा. जैताळवाडी, ता. जि. बीड**
**५. अनिषा पि. दादाभाऊ उर्फ दादाराव जोगदंड, वय १८ वर्षे, धंदा-शिक्षण रा. जैताळवाडी, ता. जि. बीड**
**६. समाधान पि. दादाभाउ उर्फ दादाराव जोगदंड, वय-१२ वर्षे, धंदा-शिक्षण रा. जैताळवाडी, ता. जि. बीड**
**अ.पा.क. आई अर्जदार क. १ सुनिता प्र.दादाराव जोगदंड**
**(अर्जदार हे भारतीय आहेत)**
**विरुध्द**
**निरंक**
**मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत...**

वरील अर्जदार यांनी न्यालयात मयत दादाराव रामभाऊ जोगदंड यांचे वारस असल्याबाबचे अर्ज केला आहे

ज्याअर्थी दादाराव रामभाऊ जोगदंड यांचा मृत्यु दिनांक ०८.१०.२०१३ रोजी जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क्र.०१ ही मयताची पत्नी आहे.अर्जदार क्र.२ ते ५ ह्या विवाहीत मुली असून अर्जदाराचा मुलगा आहे हे कायदेशीर वारस आहे

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एका महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी पोग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदर अर्जदारांच्या हक्काचददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांना हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहू मयत दादाराव रामभाऊ जोगदंड यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१२ माहे फेब्रुवारी २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालायच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.२० मार्च २०२४.

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर,बीड**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**

---

**जाहिर प्रगटन**
**मा. श्री.व्ही.सी. जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २०७/२०२४**
**ॲड. रोटे डी. एम. यांच्या मार्फत**
**असराबाई सखाराम खोड वि. निरंक**
**ज्यापेक्षा १ गेनदेव उर्फ ग्यानदेव पि. नाना बायभट, रा. पिंपरनई पो. लिंबागणेश ता.जि.बीड हे दिनांक ०२.०४.२०२१ रोजी राहते परी व येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच**
**१) असराबाई सखाराम खोड**
**पत्ता - कांबी पोस्ट कामखेडा तालुका जिल्हा बीड**
**२) मशुराबाई शहादेव सावंत**
**पिंपरनई पोस्ट लिंबागणेश तालुका जिल्हा बीड**
**३) कासाबाई भागवत गायकवाड**
**आनंदवाडी पोस्ट राजुरी नवगण तालुका शिरूर कासार जि. बीड**
**४) शहादेव उर्फ शाहदेव गेनदेव वायभट पिंपरनई पोस्ट लिंबागणेश तालुका जि. बीड**
**५) महादेव गिन्यानदेव उर्फ गेनदेव वायभट पिंपरनई पोस्ट लिंबागणेश तालुका जि. बीड**

अर्जदार क १ ते ३ या मयत विवाहीत मुली आहेत तसेच अर्जदार ४ व ५ हे मयत यांचे मुले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याचाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एका महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी पोग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदर अर्जदारांच्या हक्काचददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांना हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहू मयत गेनदेव उर्फ ग्यानदेव पि.नाना वायभट यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ११/०३/२०२४ आहे.

आज दिनांक ०७ फेब्रुवारी २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर,बीड**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**

---

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**
**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला**
**अंबिका चौक, पांगरी रोड, शाहू नगर, बोड ता.जि. बीड पिन ४३११२२**
**जाहिर नोटीस**
**जा.क्र. १६८ दि. ०९/२/२०२४**
तक्रार क्र.१२७/२०२३

अर्जदार:

१. सखाराम रामकष्ण खिंडकर, रा. तगारा पो. धसपिंपळगाव ता. पाटोदा जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार:-

०२. अश्विनी सुनिल वांढरे, (प्रबंधक) जिजाऊ माँसाहेब मल्टी स्टेट क्रेडीट लि.बीड. मुख्य शाखा राजूव गांधी चौक बीड़ रा. विप्र नगर, ब्राम्हणवाडी, बीड, ता. जि. बीड.

०३. मनिष बबन शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टी स्टेट क्रेडीट लि.बौड.रा.राजीव गांधी चौक, बीड ता. जि. बीड.

०४. योगेश नवनाथ शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टी स्टेट क्रेडीट लि.बीड.रा.राजीव गांधी चौक, बौड ता. जि. बीड.

०५. बबन विश्वनाथ शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टी स्टेट क्रेडीट लि.बीड रा.राजीव गांधी चौक, बीड ता. जि. बीड.

उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय तक्रार अर्जदार सखाराम रामकृष्ण खिंडकर यांनी आपल्याविरुध्द तक्रार क्रमांक १२७/२०२३ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड येथे दाखल केलेली आहे. सदर तक्रारीमध्ये आपणास पाठविण्यात आलेली नोटीस सामनेवाले क्र.०२ ते ०५ सदर व्यक्ती दिलेल्या पत्यावर भेटत नाही. णपलश्ररळाशव ॐ डेलज्ञ असा शेरा लिहून परत आलेली आहे.

तरी सदर जाहिर नोटीसीव्दारे आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने आपले म्हणणे मांडण्यासाठी आपण जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड येथे दिनांक २६/०३/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रत्यक्ष किंवा प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहावे. अन्यथा सदर तक्रारीबाबत आपणास काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०८.०२.२०२४ रोजी माझे सहिनिशी व मा. जिल्हा आयोगाच्या शिक्क्यानिशी दिले.

मा. आयोगाच्या आदेशानुसार

दिनांक ०८/०२/२०२४
ठिकाण - बीड

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड**

---

**नमुना- इ- 4**
**(नियम 18 पहा)**

**निवडणूक निर्णय अधिकारी:-** एस. एस. सांगुळे

पदनाम:- सहकार अधिकारी श्रे-२, संलग्न उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड (सेवावर्ग) जि. बीड

**सहकारी संस्थेचे नाव:-** सावित्रीज्योती महिला मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. जेबापिंप्री ता. जि. बीड

अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक:-05/02/2024

महाराष्ट्र सहकारी संस्था, (समितीचे निवडणूक) नियम 2014 च्या नियम 18 अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, बीड यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या निवडीकरीता मी, एस. एस. सांगुळे संलग्न, सहकार अधिकारी श्रे-२, संलग्न उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड (सेवावर्ग) जि. बीड आणि मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, बीड व मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने सावित्रीज्योती महिला मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. जेबापिंप्री ता. जि. बीड यांच्या समितीच्या सदस्यांची सन 2024 ते 2029 या कालावधीची निवडणूक घेण्याकरीता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी याद्वारे सावित्रीज्योती महिला मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. जेबापिंप्री ता. जि. बीड म्हणून ओळखल्या जाणा-या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या निवडणूकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करुन दि.15.02.2024 पासुन जाहीर करीत आहोत आणि सोबत जोडलेल्या अनुसूचिच्या स्तंभ 2 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या संबंधातील निवडणूक नियम करीत आहोत.

**अनुसूची**

| अ क्रं | मतदार संघाचे नांव | | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठीची तारीख (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा व वेळ) | नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिध्द करणे | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिवस आणि वेळ व ठिकाण | विधीग्राहय नामनिर्देशनपत्रांची सूची प्रसिध्दीची तारीख | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याची तारीख | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्हांचे वाटप व उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्दी दिनांक | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ आणि ठिकाण | मतमोजणी तारीख, वेळ व ठिकाण | मतदानाचे निकाल घोषीत करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | सर्वसाधारण | 8 | दि.15.02.24 ते दि.22.02.24 (सुटीचे दिवस वगळून ) सकाळी 11.00 ते दु.3.00वाजेपर्यत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.15.02.24 ते दि.22.02.24 जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज दु.4.00 वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.23.02.24 सकाळी 11.00 पासुन छाननी संपेपर्यत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.26.02.24 सकाळी 11.00 वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.26.02.24 ते दि. 11.03.24 सकाळी 11.00 ते दु.3.00 पर्यत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.12.03.24 सकाळी 11.00 वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.23.03.24 वेळ- सकाळी 8.00 ते दुपारी 4.00 पर्यंत, ठिकाण:- नंतर कळविण्यात येईल | दि.23.03.24 वेळ- दु.4.15 पासुन ठिकाण:- नंतर कळविण्यात येईल | दि.23.03.24 मतमोजणी संपल्यानंतर लगेच नंतर कळविण्यात येईल |
| 2 | महिला | 2 | | | | | | | | | |
| 3 | अनुसुचित जाती/ जमाती | 1 | | | | | | | | | |
| 4 | इतर मागासवर्गीय | 1 | | | | | | | | | |
| 5 | भटक्या विमुक्त जाती/ जमाती व विशेष मागास प्रवर्ग | 1 | | | | | | | | | |
| | **एकुण** | 13 | | | | | | | | | |

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता:- उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. बीड, जि. बीड दुसरा मजला, "सहकार शक्ती" इमारत, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड.
संपर्क क्रमांक:- 9511615189 ईमेल आयडी – dyr_bhr99@rediffmail.com
निवडणूक संदर्भातील इतर अटी व शर्थी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील.

(एस. एस. सांगुळे)
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**सावित्रीज्योती महिला मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. जेबापिंप्री ता. जि. बीड**

(समृत जाधव)
**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड**

(अशोक गाडे)
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**

दैनिक
मराठवाडा पत्र






# सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने केज शहरासह तालुक्यातही बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

केज/ प्रतिनिधी

सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने केज शहरासह तालुक्यातही बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.याबाबतची सविस्तर माहिती अशी की,मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील हे गेल्या चार दिवसांपासून अन्नपाणी त्यागुन आमरण उपोषणास बसले आहेत त्यांची प्रकृती खालावत चालली तरी सरकारने लवकरात लवकर विशेष अधिवेशन घेऊन सगे सोयरे या अधिसूचनेचे कायद्यामध्ये रुपांतर करावे यासाठी सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने महाराष्ट्र बंदची हाक दिली होती याचाच एक भाग म्हणुन केज शहरा सह तालुक्यातील सर्व गावातील सकल मराठा समाज बांधवांनीगावातील किराणा दुकाने,चहाचे हॉटेल,पानटपरी,कृषी दुकानदार व इतर समाज बांधवांच्या व्यावसायिकांनी आपले दुकाने बंद ठेवून सदर बंद मध्ये सहभागी होऊन शंभर टक्के बंद यशस्वी केला यावेळी सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठा समाज बांधवांच्या मागणीला पाठिंबा देत इतरही समाज बांधव सहभागी होऊन उत्स्फूर्त पणे पाठिंबा देऊन सहकार्य केले.सदरचा बंद हा शांततेत केज शहरासह तालुक्यांमध्ये पार पडला यावेळी पोलीस प्रशासना च्या वतीने तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**महाराष्ट्र शासन**
वनविभाग
सामाजिक वनीकरण विभाग बीड
वनपरीक्षेत्र सामाजिक वनीकरण आष्टी
**निविदा सुचना**
जा.क्र./सावपपा/संकीर्ण/385/2023-24 दि.14.02.2024

वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र आष्टी अंतर्गत असलेल्या शासकीय गायरानातील खालील कामांकरीता मोहरबंद पद्धतीच्या निविदा (बी-1) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामांचे नांव व ठिकाण | कामांची अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निवीदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | मौजे सालेवडगांव येथे वनतळे तयार करणे. मौजे सालेवडगांव ता. आष्टी जि.बीड | 993502.00 | 9935.00 | 200.00 |
| 2 | चेनलिंग फेन्सिंग आरणवहीरा घनवृक्ष लागवड 0.70 हे.(प्रथम वर्ष) मौजे आरणवहीरा ता. आष्टी जि.बीड | 633000.00 | 6330.00 | 200.00 |

**अटी व शर्ती**
1) आवश्यक त्या विभागाचा नोंदणीकृत ठेकेदार निवीदा भरण्यास पात्र राहील.
2) अ) कोऱ्या निवीदा विक्री दिनांक 16.02.2024 सकाळी 10.00 वाजेपासुन ते दिनांक 22.02.2024 रोजी सायंकाळी 5.00 वाजपर्यत केवळ कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र आष्टी कार्यालयात उपलब्ध होतील.
ब) मोहरबंद निविदा स्विकारण्याचा अंतीम दिनांक 22.02.2024 रोजी कार्यालयीन वेळेत.
क) निविदा उघडण्याचा दिनांक 23.02.2024 रोजी कार्यालयीन वेळेत किंवा प्रशासकीय सोईनुसार.
3) निविदा पोटी इसारा रक्कम लेखा विभागात रोखीने भरुन पावतीची मुळ प्रत व ठेकेदाराचे आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती लिफाफा क्रं. 01 च्या आत ठेऊन व त्या लिफाफ्यावर अनामत पावतीचा तपशिल लिहुन लिफाफा क्रं. 01 व लिफाफा क्रं. 02 निविदा सिलबंद करुन वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र आष्टी कार्यालयात दाखल करावेत.
4) इसारा रक्कमेचा डी.डी. हा कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेडयुल बॅंकेचा विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण बीड यांचे नांवाने सादर करावा.
5) सदर कामांचा कालावधी हा चालु 2023-24 या आर्थीक वर्षाचा असुन सर्व कामे याच वर्षात पुर्ण करणे बंधनकारक राहिल.
6) या जाहिरातीबाबत अधिक माहिती वनपरीक्षेत्र सामाजिक वनीकरण आष्टी यांच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे. व अधिकच्या माहितीसाठी या कार्यालयास संपर्क करावा.
7) प्राप्त निविदा पैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार सामाजिक वनीकरण विभाग बीड यांनी राखुन ठेवला आहे. याची कारणे दिली जाणार नाहीत.

सही/-
**वनक्षेत्रपाल**
**सामाजिक वनीकरण आष्टी**

**महाराष्ट्र शासन**
वनविभाग
सामाजिक वनीकरण विभाग बीड
वनपरीक्षेत्र सामाजिक वनीकरण शिरुर का.
**निविदा सुचना**
जा.क्र./सावपपा/संकीर्ण/136/2023-24 दि.14.02.2024

वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र शिरुर कासार अंतर्गत असलेल्या शासकीय गायरानातील खालील कामांकरीता मोहरबंद पद्धतीच्या निविदा (बी-1) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामांचे नांव व ठिकाण | कामांची अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निवीदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | मौजे खरगवाडी घनवृक्ष लागवड 0.50 हे तृतीय वर्षे येथे वनतळे तयार करणे. मौजे खरगवाडी ता. शिरुर कासार जि.बीड | 993249.00 | 9932.00 | 200.00 |
| 2 | मौजे पोंडुळ येथे वनतळे तयार करणे. मौजे पोंडुळ ता. शिरुर कासार जि.बीड | 993502.00 | 9935.00 | 200.00 |

**अटी व शर्ती**
1) आवश्यक त्या विभागाचा नोंदणीकृत ठेकेदार निवीदा भरण्यास पात्र राहील.
2) अ) कोऱ्या निवीदा विक्री दिनांक 16.02.2024 सकाळी 10.00 वाजेपासुन ते दिनांक 22.02.2024 रोजी सायंकाळी 5.00 वाजपर्यत केवळ कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र शिरुर कासार कार्यालयात उपलब्ध होतील.
ब) मोहरबंद निविदा स्विकारण्याचा अंतीम दिनांक 22.02.2024 रोजी कार्यालयीन वेळेत.
क) निविदा उघडण्याचा दिनांक 23.02.2024 रोजी कार्यालयीन वेळेत किंवा प्रशासकीय सोईनुसार.
3) निविदा पोटी इसारा रक्कम लेखा विभागात रोखीने भरुन पावतीची मुळ प्रत व ठेकेदाराचे आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती लिफाफा क्रं. 01 च्या आत ठेऊन व त्या लिफाफ्यावर अनामत पावतीचा तपशिल लिहुन लिफाफा क्रं. 01 व लिफाफा क्रं. 02 निविदा सिलबंद करुन वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र शिरुर कासार कार्यालयात दाखल करावेत.
4) इसारा रक्कमेचा डी.डी. हा कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेडयुल बॅंकेचा विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण बीड यांचे नांवाने सादर करावा.
5) सदर कामांचा कालावधी हा चालु 2023-24 या आर्थीक वर्षाचा असुन सर्व कामे याच वर्षात पुर्ण करणे बंधनकारक राहिल.
6) या जाहिरातीबाबत अधिक माहिती वनपरीक्षेत्र सामाजिक वनीकरण शिरुर का. यांच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे. व अधिकच्या माहितीसाठी या कार्यालयास संपर्क करावा.
7) प्राप्त निविदा पैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार सामाजिक वनीकरण विभाग बीड यांनी राखुन ठेवला आहे. याची कारणे दिली जाणार नाहीत.

सही/-
**वनक्षेत्रपाल**
**सामाजिक वनीकरण शिरुर कासार**

**महाराष्ट्र शासन**
वनविभाग
सामाजिक वनीकरण विभाग बीड
वनपरीक्षेत्र सामाजिक वनीकरण पाटोदा
**निविदा सुचना**
जा.क्र./सावपपा/संकीर्ण/149/ 2023-24 दि.14.02.2024

वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र पाटोदा अंतर्गत असलेल्या शासकीय गायरानातील खालील कामांकरीता मोहरबंद पद्धतीच्या निविदा (बी-1) मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामांचे नांव व ठिकाण | कामांची अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निवीदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | मौजे चिखली येथे वनतळे तयार करणे. मौजे चिखली ता.पाटोदा जि.बीड | 992235.00 | 9922.00 | 200.00 |
| 2 | मौजे बेडुकवाडी घनवृक्ष लागवड 0.40 हे. येथे वनतळे तयार करणे. मौजे बेडुकवाडी ता.पाटोदा जि.बीड | 996543.00 | 9965.00 | 200.00 |
| 3 | चेनलिंग फेन्सिंग बेडुकवाडी (दासखेड) घनवृक्ष लागवड 0.40 हे.(प्रथम वर्ष) मौजे बेडुकवाडी ता.पाटोदा जि.बीड | 467900.00 | 4679.00 | 200.00 |

**अटी व शर्ती**
1) आवश्यक त्या विभागाचा नोंदणीकृत ठेकेदार निवीदा भरण्यास पात्र राहील.
2) अ) कोऱ्या निवीदा विक्री दिनांक 16.02.2024 सकाळी 10.00 वाजेपासुन ते दिनांक 22.02.2024 रोजी सायंकाळी 5.00 वाजपर्यत केवळ कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र पाटोदा कार्यालयात उपलब्ध होतील.
ब) मोहरबंद निविदा स्विकारण्याचा अंतीम दिनांक 22.02.2024 रोजी कार्यालयीन वेळेत.
क) निविदा उघडण्याचा दिनांक 23.02.2024 रोजी कार्यालयीन वेळेत किंवा प्रशासकीय सोईनुसार.
3) निविदा पोटी इसारा रक्कम लेखा विभागात रोखीने भरुन पावतीची मुळ प्रत व ठेकेदाराचे आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती लिफाफा क्रं. 01 च्या आत ठेऊन व त्या लिफाफ्यावर अनामत पावतीचा तपशिल लिहुन लिफाफा क्रं. 01 व लिफाफा क्रं. 02 निविदा सिलबंद करुन वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र पाटोदा कार्यालयात दाखल करावेत.
4) इसारा रक्कमेचा डी.डी. हा कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेडयुल बॅंकेचा विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण बीड यांचे नांवाने सादर करावा.
5) सदर कामांचा कालावधी हा चालु 2023-24 या आर्थीक वर्षाचा असुन सर्व कामे याच वर्षात पुर्ण करणे बंधनकारक राहिल.
6) या जाहिरातीबाबत अधिक माहिती वनपरीक्षेत्र सामाजिक वनीकरण पाटोदा यांच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे. व अधिकच्या माहितीसाठी या कार्यालयास संपर्क करावा.
7) प्राप्त निविदा पैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार सामाजिक वनीकरण विभाग बीड यांनी राखुन ठेवला आहे. याची कारणे दिली जाणार नाहीत.

सही/-
**वनक्षेत्रपाल**
**सामाजिक वनीकरण पाटोदा**

**महाराष्ट्र शासन**
वनविभाग
सामाजिक वनीकरण विभाग बीड
वनपरीक्षेत्र सामाजिक वनीकरण गेवराई
**निविदा सुचना**
जा.क्र./सावपगे/संकीर्ण/ 201/2023-24 दि.14.02.2024

वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण रीक्षेत्र गेवराई अंतर्गत असलेल्या शासकीय गायरानातील खालील कामांकरीता मोहरबंद पद्धतीच्या निविदा (बी-1) मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामांचे नांव व ठिकाण | कामांची अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निवीदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | मौजे अर्धपिंप्री येथे वनतळे तयार करणे. मौजे अर्धपिंप्री ता.गेवराई जि.बीड | 995784.00 | 9958.00 | 200.00 |
| 2 | मौजे खळेगांव व्दितीय वर्षे गटलागवड 10 हेक्टर येथे वनतळे तयार करणे. मौजे खळेगांव ता.गेवराई जि.बीड | 995276.00 | 9953.00 | 200.00 |
| 3 | मौजे जळगांव व्दितीय वर्षे गटलागवड 08 हेक्टर येथे वनतळे तयार करणे. मौजे जळगांव मजरा ता.गेवराई जि.बीड | 994008.00 | 9940.00 | 200.00 |
| 4 | चेनलिंग फेन्सिंग खळेगांव घनवृक्ष लागवड 0.50 हे.(प्रथम वर्ष) मौजे खळेगांव ता.गेवराई जि.बीड | 533000.00 | 5330.00 | 200.00 |

**अटी व शर्ती**
1) आवश्यक त्या विभागाचा नोंदणीकृत ठेकेदार निवीदा भरण्यास पात्र राहील.
2) अ) कोऱ्या निवीदा विक्री दिनांक 16.02.2024 सकाळी 10.00 वाजेपासुन ते दिनांक 22.02.2024 रोजी सायंकाळी 5.00 वाजपर्यत केवळ कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र गेवराई कार्यालयात उपलब्ध होतील.
ब) मोहरबंद निविदा स्विकारण्याचा अंतीम दिनांक 22.02.2024 रोजी कार्यालयीन वेळेत.
क) निविदा उघडण्याचा दिनांक 23.02.2024 रोजी कार्यालयीन वेळेत किंवा प्रशासकीय सोईनुसार.
3) निविदा पोटी इसारा रक्कम लेखा विभागात रोखीने भरुन पावतीची मुळ प्रत व ठेकेदाराचे आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती लिफाफा क्रं. 01 च्या आत ठेऊन व त्या लिफाफ्यावर अनामत पावतीचा तपशिल लिहुन लिफाफा क्रं. 01 व लिफाफा क्रं. 02 निविदा सिलबंद करुन वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र गेवराई कार्यालयात दाखल करावेत.
4) इसारा रक्कमेचा डी.डी. हा कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेडयुल बॅंकेचा विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण बीड यांचे नांवाने सादर करावा.
5) सदर कामांचा कालावधी हा चालु 2023-24 या आर्थीक वर्षाचा असुन सर्व कामे याच वर्षात पुर्ण करणे बंधनकारक राहिल.
6) या जाहिरातीबाबत अधिक माहिती वनपरीक्षेत्र सामाजिक वनीकरण गेवराई यांच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे. व अधिकच्या माहितीसाठी या कार्यालयास संपर्क करावा.
7) प्राप्त निविदा पैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार सामाजिक वनीकरण विभाग बीड यांनी राखुन ठेवला आहे. याची कारणे दिली जाणार नाहीत.

**सही/-**
**वनक्षेत्रपाल**
**सामाजिक वनीकरण गेवराई**

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड जिल्हा

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

THURSDAY DT.15 FEBRUARY 2024
गुरुवार,दि.१५ फेब्रुवारी २०२४



# दगडी पाटा,वरवंटा व खलबत्ता शहरासह ग्रामीण भागातून कालबाह्य



**ज्योतीराम पांढरपोटे/माजलगाव**

**स्वयंपाक म्हटला की वाटणं आलेच आणि हे वाटण दगडी खलबत्ता, पाटा,वरवंट्यावरील असेल,तर जेवणाचा स्वादच वेगळा असतो.मात्र, आधुनिक राहणीमान उंचावल्याने पूर्वी वापरात असणारे चूल,दगडी जातं, खलबत्ता, पाटे-वरवंटे या वस्तूंची जागा आता अनुक्रमे गॅस,पीठ गिरणी व मिक्सरने घेतल्याने त्या अडगळीच्या ठिकाणी दिसत आहेत.**



पूर्वी शहरासह ग्रामीण भागातील प्रत्येक घराच्या बाहेर वाटण व इतर पदार्थ वाटण्यासाठी दगडी पाट्याचा व वरवंट्याचा उपयोग केला जात होता. त्या पदार्थाला एक वेगळीच चव निर्माण होत असे.वाटण वाटून झाले की पाटा व वरवंटा घरच्या बाहेर अंगणात उभा करून ठेवला जायचा.घरच्या जेवणात वाटण हे नेहमीच लागते. त्यामुळे दररोज पाटा,वरवंटा वापरात असायचा.

रोजच्या वापरामुळे त्याची झिज होऊन जायची.अशा वेळी घरातील पाटा-वरवंट्याला टाकी लावून घ्यायची असेल, तर घरातील गृहिणी टाकी लावणाऱ्या बाईला बोलवत असे.तिच्याकडे घरातील पाटा-वरवंटा टाकी लावण्यासाठी सुपूर्द केल्या जायच्या. कुटण्यासाठी खलबत्ता उपयोगी पडत असला,तरी त्यात फक्त कोरडे पदार्थ बनवणे शक्य होत असते;परंतु पदार्थाला ओलसरपणा असण्याची गरज असेल,तर त्यासाठी मात्र पाटा-वरवंटा वापरण्याशिवाय पर्याय नव्हता. साधारण दोन ते तीन इंच जाडीचा काळ्या दगडापासून पंचकोनी आकारात पाटा बनवण्यात येतो.हा पंचकोनी असला तरी त्याचा साधारण आकार पोस्टाच्या उघड्या पाकिटासारखा असतो.म्हणजे समान लांबीच्या दोन समांतर बाजू, एक बाजू त्यापेक्षा कमी लांबीची आणि वरच्या दोन बाजू वर निमुळत्या होत एका ठिकाणी मिळालेल्या. जमिनीपासून थोडा वर राहावा म्हणून त्याच्या एका बाजूला त्याच दगडातून कोरून एक सपाट उंचवटा तयार केलेला असतो.म्हणजे जमिनीवर तो आडवा टाकला की, वाटणाऱ्या व्यक्तीला त्याच्यावर वाटण करणे सोपे जाते. याबरोबरच वरवंटा असल्याशिवाय हा संच पूर्ण होत नाही. वरवंटादेखील काळ्या दगडापासून बनवलेला असतो. वरवंट्याची लांबी आणि जाडी पाट्याच्या आकाराला योग्य अशा प्रमाणात असते. दंडगोलाकृती काळ्या दगडापासून बनवलेल्या वरवंटाच्या दोन्ही बाजू मधल्या बाजूपेक्षा कमी जाडीच्या आणि किंचित उतरत्या स्वरूपात असतात. ज्या पदार्थाचे वाटण करायचे असेल तो पदार्थ पाटा आणि वरवंट्यामध्ये घर्षण करत मध्ये मध्ये आवश्यक तितके पाणी वापरून त्याचा एकसंध ओला गोळा तयार करता येतो. हे वाटण करताना वाटणाऱ्याला पदार्थ किती बारीक झाला आहे याचा वारंवार अंदाज घेता येतो आणि त्यामुळे पदार्थ जितका बारीक करणे आवश्यक आहे, तितकाच तो करणे शक्य होतो. मिक्सर ग्राईंडरमध्ये ते शक्य होत नाही.शिवाय, यात घर्षणाने अधिक उष्णता निर्माण होत नसल्यामुळे पदार्थाची मूळ चव कमी न होता उलटपक्षी अधिक चवदार वस्तू बनते. पुरणपोळीसाठी डाळीचे पुरण, ओला किंवा सुका नारळ घालून केलेली चटणी किंवा वाटली डाळ,आंबे डाळ किंवा इडली-वड्यासारखे दक्षिणी पदार्थ, मांसाहार किंवा मत्स्याहार करण्यासाठी जो ओला मसाला करावा लागतो त्यासाठी पाटा-वरवंटा नेहमी वापरला जायचा.

पाटा-वरवंट्यामुळे महिलांमध्ये असणारा कणखरपणा मिक्सरवरील कामामुळे कमी झाला आहे. याबरोबरच खाण्यातील सकसपणाही कालबाह्य झाला आहे.त्यासोबत शरीरस्वास्थ्यही लयाला गेल्याचे पाहायला मिळते.

सद्यस्थितीत प्रत्येक घराच्या बाहेर व रोज वापरात असणारा पाटा, वरवंटा; तसेच कुटण्यासाठी लागणारा खलबत्ता सर्वत्र आधुनिक स्वयंपाकघरांतून आता अदृश्य झाला आहे.त्याऐवजी विजेवर चालणारा मिक्सर आला आहे. इतर काही वस्तूंबरोबरच पाटा-वरवंटा आता इतिहासजमा होणार असे म्हणायला हरकत नाही.काही घरात तो पाहायला मिळतो; मात्र तोही फक्त अडगळीत किंवा संग्रहालय अथवा शोभेची वस्तू म्हणून ठेवलेला आढळतो.

पाटा,वरवंटा काही वर्षांपूर्वी सर्वत्र वापरात होता. त्यातून वाटलेल्या पदार्थाला चव वेगळीच जाणवत असायची.जी चव आज दुर्मीळ झालेली आहे.

# कऱ्हेवडगांव विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या चेअरमन पदी सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ खाडे

## तर व्हा.चेअरमन पदी परमेश्वर नागरगोजे यांची बिनविरोध निवड

**आष्टी (प्रतिनिधी)**

तालुक्यातील बहुचर्चित कऱ्हेवडगांव विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा संस्था मर्या.कऱ्हेवडगाव संचालक मंडळ निवडीसाठी दि. २८रोजी विक्रमी मतदान होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा अध्यक्ष रामभाऊ खाडे यांच्या नेतृत्वाखालील जय मल्हार कृषी विकास पॅनलने विरोधकांचा सुपडा साफ करत एक हाती सत्ता मिळवली. आ. सुरेश धस पुरस्कृत स्व.लोकनेते गोपीनाथ मुंडे पॅनला पराभवाची धूळ चारली होती. जय मल्हार कृषी विकास पॅनलचे सर्वच उमेदवार मोठ्या मताधिक्याचे विजयी झाले होते.या पॅनलने एक जागा बिनविरोध मिळवली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा अध्यक्ष



रामभाऊ खाडे यांच्या नेतृत्वाखाली जय मल्हार कृषी विकास पॅनल व विधानपरिषदेचे आमदार सुरेश धस पुरस्कृत कऱ्हेवडगावचे सरपंच परिवंत गायकवाड, कऱ्हेवाडीचे सरपंच छाया गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली आजी माजी दिग्गजांच्या एकत्रित स्व. स्व.लोकनेते गोपीनाथ मुंडे पॅनल यांच्यामध्ये सरळ लढत झाली होती. राखीव प्रतिनिधी मतदारसंघाची जागा बिनविरोध निघाल्याने संचालक पदाच्या १२ जागेसाठी २४ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरले होते.यामध्ये सर्वसाधारण खातेदार/ कर्जदार या मतदारसंघातुन आठ जागेसाठी १६ उमेदवार, महिला राखीव प्रतिनिधी मतदारसंघातुन २जागेसाठी ४ उमेदवार, इतर मागासवर्गीय प्रतिनिधी १जागेसाठी दोन उमेदवार, भटक्या विमुक्त जाती अथवा विशेष मागास प्रवर्ग प्रतिनिधी एका जागेसाठी २ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरले होते. . दि.१३रोजी सर्वसाधारण सभेत चेअरमन पदी रामभाऊ खाडे यांची तर व्हा.चेअरमन पदासाठी परमेश्वर नागरगोजे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. या निवड बदल त्यांच्यावर सुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

संस्थेच्या बळकटीकरणासाठी सातत्याने प्रयत्न करणार- रामभाऊ खाडे

कऱ्हेवडगाव विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या निवडणूकीत सुज्ञ मतदार बंधु आणि भगिनींनी जय मल्हार कृषी विकास पॅनलवर विश्वास ठेवत सर्वच उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी केले. आमच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरेल असे काम करणार आहोत. पुढील काळात संस्थेच्या माध्यमातून विविध योजना प्रभावीपणे राबवत बळकटीकरणासाठी सतत प्रयत्न करणार .

# वातावरणीय बदलाच्या संकटाचे कृषी पदवीधरानी संधीत रूपांतर करावे – कृषिमंत्री धनंजय मुंडे

**मुंबई (प्रतिनिधी)**

आजच्या शेतीसमोर वातावरणातील बदलाचे प्रमुख संकट आहे. कृषी विद्यापीठातून पदवीधर घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी वातावरणीय बदलाच्या संकटाचे संधीमध्ये रूपांतर करावे, असे आवाहन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे प्रतिकुलगुरू तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. डॉ पंजाबराव देशमुख विद्यापीठाच्या ३८ व्या दीक्षांत समारंभाला कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दूरदृष्टी प्रणालीद्वारे संबोधित केले. त्यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले की, कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे ज्ञानार्जनाचे काम संपले असले तरी वास्तविक जीवनात त्यांची खरी परीक्षा आजपासून सुरू होणार आहे. भारत सरकारने नुकतेच एम. एस. स्वामीनाथन यांना नुकतेच मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन गौरवले आहे. कै स्वामीनाथन यांनी वेगवेगळ्या वाणांचे संशोधन करून देशातील शेतकऱ्यांची उत्पादकता वाढवली व देशासमोरील अन्नधान्याचे संकट दूर केले. त्यांची प्रेरणा घेऊन काम केल्यास तुमच्यातूनच एखादा स्वामीनाथन तयार होऊन देशासमोरील मोठ्या अडचणींचे निराकरण करू शकतो असा विश्वास



श्री मुंडे यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र शासनाने नुकताच गुगल बरोबर आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रात भागीदारीचा करार केला आहे. या कराराचा सर्वात मोठा फायदा कृषी क्षेत्राला होणार आहे. आगामी काळ आर्टिफिशियल इंटेलिजन्स असल्यामुळे कृषी पदवीधरांनी त्यासंबंधीच्या ज्ञानाचे पंख लावल्यास ते निश्चितपणे मोठी भरारी घेऊ शकतील.आपल्या ज्ञानाचा जास्तीत जास्त फायदा शेतकऱ्यांना करून द्यावा. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करण्याचे स्वप्न पाहिले आहे यामध्ये महाराष्ट्राचे आणि कृषी क्षेत्राचे मोठे योगदान असणार आहे. कृषी विद्यापीठातील विद्यार्थी हे स्वप्न साकारण्यासाठी प्रयत्न करतील असाही विश्वास मंत्री श्री. मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

या समारंभारास राज्यपाल श्री रमेश बैस दूरदृश्य प्रणालीद्वारे तसेच कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. झेड. पी. पटेल, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत पाटील, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रा मणी, महाराष्ट्र कृषी व मत्स्य विद्यापीठाचे डॉ. नितीन पाटील, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे डॉ. शरद गडाख माजी कुलगुरू पद्मश्री मोतीलाल मदन, एस. एन. पुरी व इतर मान्यवर उपस्थित होते.

# श्री विश्वकर्मा जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

## श्री राम कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास उपस्थित रहावे – परमेश्वर पांचाळ आमसुले

**माजलगांव (प्रतिनिधी)**

श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटना व श्री विठ्ठल रुक्मिणी प्रतिष्ठान मंडळ श्री संत ज्ञानेश्वर नगर भाटवडगाव ता. माजलगांव यांच्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री विश्वकर्मा जयंती निमित्त दिनांक १५ फेब्रुवारी गुरुवार रोजी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी श्री राम कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात रामायणाचार्य श्री ह भ प गुरु तुकाराम महाराज शास्त्री,श्री ह भ प युवा कीर्तनकार रामहरी महाराज जवळेकर, श्री ह भ प एकनाथ महाराज माने, श्री ह भ प भागवताचार्य अशोक महाराज चिगुरे , श्री ह भ प विनोदाचार्य कालिदास महाराज नाईकनवरे, श्री ह भ प भागवताचार्य स्वरभूषण रामेश्वर मते महाराज, श्री ह भ प मृदंग अलंकार




अशोक महाराज पांचाळ, श्री ह भ प विनोदाचार्य पांडुरंग महाराज उगले यांचे प्रवचन व किर्तन होणार आहे. या सोहळ्यास विषेश उपस्थिती म्हणून मा.खा. प्रितमताई मुंडे ( खासदार बीड ), मा.आ.डॉ.संजयजी रायमूलकर ( मेहकर - लोनार मतदार संघ ), माजी आ. राधाकृष्ण अण्णा होके पाटिल, मा. आ. प्रकाशदादा सोळके ( माजलगांव मतदार संघ ), मा.प्रा. विजय रा. रायमल, मा. वर्षाताई मनाळे ( तहसीलदार माजलगांव ), मा. मोहनदादा जगताप ( व्हा.चेअरमन छ.स.सा. कारखाना ) , मा. रमेशराव आडसकर ( जेष्ठ नेते भाजपा ), मा.जयसिंहभैय्या सोळंके ( व्हा.चेअरमन मा.स.सा.का.) मा. नितीनदादा नाईकनवरे ( मा. सभापती कृ. उ.बा.स. माजलगांव ), मा.नारायण अण्णा डक ( विधानसभा प्रमुख रा.कॉ.पा.) , मा. शिवाजीभाऊ रांजवण ( सं. दै.कार्यारंभ ), मा. शांतीनाथ डोरले ( भाजपा संयोजक ) इत्यादी मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून दिनांक २२ फेब्रुवारी गुरुवार रोजी सकाळी ठिक ९ वाजता मान्यवरांच्या हस्ते श्री. विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन करून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटना माजलगाव तालुकाध्यक्ष परमेश्वर पांचाळ आमसुले यांनी केले आहे .

# डॉ. नूतन जोशी यांना सुवर्णपदक अंबाजोगाईची सुकन्येची गरुड भरारी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील डॉ. नूतन दामोदरराव जोशी वाढवणकर यांनी चेन्नई येथील एम. जी. आर. वैद्यकीय विद्यापीठाचे डी.एम. हिमॅटोलॉजी (रक्तविकार आणि चिकित्सा विज्ञान) या विषयातील सुवर्णपदक पटकावले आहे. या पूर्वीही डॉ. नूतन यांनी सुपरस्पेशालिटीच्या नीट परीक्षेत देशात प्रथम क्रमांक मिळविला होता. अंबाजोगाईच्या रहिवासी असलेल्या डॉ. नूतन या येथील गोदावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी कन्या



शाळेच्या विद्यार्थिनी आहेत. लहानपणापासूनच त्यांनी शालेय तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तुंग यश मिळविले आहे. मुंबईच्या लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालय, सायन येथून त्यांनी एम.बी.बी.एस. व एम. डी. मेडीसिन केले. पुढे तामिळनाडू मधील वेल्लोरच्या ख्रिश्चन मेडिकल कॉलेज मधून त्यांनी आपला हिमॅटोलॉजी मधील सुपरस्पेशालिटीचा अभ्यासक्रम पूर्ण केला. सध्या त्या तेथेच आपली सेवा देत आहेत. आपल्या उत्तुंग यशाने त्यांनी अंबाजोगाई करांचा लौकिक वाढविला आहे.

# छोटा हत्तीखाना लेणी जतन व दुरुस्तीसाठी १ कोटी ८३ लक्ष रुपयांच्या निधी मंजूर

## आ. नमिता मुंदडा यांचे विशेष प्रयत्न

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

अंबाजोगाई शहराच्या ऐतिहासिक आणि धार्मिक भावनांशी जोडल्या गेलेल्या छोटा हत्तीखाना लेणी स्मारकाच्या जतन व दुरुस्तीसाठी राज्य शासनाच्या वतीने १ कोटी ८३ लक्ष १८ हजार ९५६ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने या संदर्भात शासन निर्णय क्र. स्मारक-२०२४/प्र.क्र.२६/सां.का.३ दि. ९ फेब्रुवारी २०२४ अन्वये हे आदेश काढण्यात आले आहेत. या शासन निर्णयात पुढे असे म्हटले आहे की, मराठवाडा प्रलंबित विकास कामाबाबत राज्य मंत्रीमंडळाची विशेष बैठक छत्रपती संभाजीनगर येथे दि.१६.०९.२०२३ रोजी पार पडली होती. त्यामध्ये घेण्यात आलेल्या निर्णयामध्ये मराठवाडा विभागातील ऐतिहासिक वास्तुचे संवर्धन करण्याचा समावेश करण्यात आला असून विशेषतः अंबाजोगाई येथील प्राचीन वास्तुस्थळाचा विकास करण्याबाबत घोषणा करण्यात आली होती. मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अंबाजोगाई येथील छोटा हत्तीखाना लेणी या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरस्ती कामाचे परिचय आर्किटेक्टस्, अंबाजोगाई यांनी तयार केलेले सविस्तर अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेकरीता संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांनी सादर केले आहे. त्यानुसार छोटा हत्तीखाना लेणी अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.सदरील प्रस्तावानुसार सभामंडप लेणी छोटा हत्तीखाना लेणी अंबाजोगाई, जि. बीड या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरुस्ती कामाच्या रु.१,८३,१८,९५६/- (अक्षरी एक कोटी त्र्याऐंशी लक्ष अठरा हजार नऊशे छप्पन मात्र) (वस्तु व सेवाकरासह) या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी मागणी क्र. झेडडी-०२, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, २२०५ कला व संस्कृती (००) १०३, पुरातत्वशास्त्र, (०१) (०६) राज्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाचे किल्ले व धार्मिक स्थळे यांची जपणूक संरक्षण (कार्यक्रम) (२२०५ १३०२) २७ लहान बांधकामे या लेखाशिर्षातील त्या त्या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा असे म्हटले आहे.तसेच संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच सदर काम हे पुरातत्वीय निकषानुसार/मानकानुसार पूर्ण होईल हे पाहण्याची जबाबदारी संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय व संबंधित संवर्धन वास्तुविशारद यांची राहील. असे या आदेशात म्हटले आहे.हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र -२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/ विनियम, भाग २, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ६ मधील परिच्छेद क्र. २७(२) अ नुसार तसेच वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक १२ एप्रिल, २०२३ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.सदरील शासन निर्णय हा महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने निर्गमित करण्यात आला असून या आदेशावर महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचीव नंदा मारोती राऊत यांची स्वाक्षरी आहे.

### आ. नमिता मुंदडा यांचे प्रयत्न

अंबाजोगाई शहराच्या धार्मिक, पौराणिक आणि ऐतिहासिक परंपरेशी जोडल्या गेलेल्या या छोटा हत्ती खाना लेणी जतन व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून घेण्यासाठी केज विधानसभा मतदारसंघाच्या आ. नमिता मुंदडा यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. आ. नमिता मुंदडा या स्वतः एक आर्किटेक्ट असून केज विधानसभा मतदारसंघातील पुरातत्व काळातील वास्तु आणि मंदिरे जतन करून त्यांची दुरुस्ती करण्याच्या कामांवर त्यांचे विशेष लक्ष आहे. याच माध्यमातून त्यांनी अंबाजोगाई शहरात असलेल्या संकलेश्वर मंदीर, भुचरनाथ मंदिर, आद्यकवी मुकुंदराज स्वामी समाधी, जोगाई सभामंडप इतर धार्मिक स्थळांच्या जतन व दुरुस्तीसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करुन घेतला आहे. आता छोटा हत्ती खाना लेणी जतन व दुरुस्ती साठी १ कोटी ८३ लक्ष रुपयांचा विशेष राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडुन मंजूर करुन घेतला आहे. एवढेच नव्हे तर हे काम सुरु करण्यासाठीची निविदा प्रक्रिया ही सुरु केली आहे.

### छोटा हत्तीखाना लेणी चे धार्मिक महत्व

अंबाजोगाई शहरालगत असलेल्या छोटा हत्तीखाना लेण्यांना विशेष महत्त्व आहे. या छोट्या हत्तीखान्यात जैन लेणी आढळून येतात. या हत्तीखान्यात कोरण्यात आलेल्या नागदंपत्ती, महावीर पार्श्वनाथ, वृक्षभनाथ व त्यांच्या यक्षी, सेवक याशिवाय तीर्थकारांचा शिल्पपट ही साकारण्यात आलेला आहे. याठिकाणी कांही शैवपंथीय लेण्यांचे भग्नावस्थेतील अवशेष आढळून यायची. तर कांही जैन लेण्यांतुन अरुंद दारांची छोटे खानी भीक्षुगृहेही आढळून आल्याच्या नोंदी आहेत.

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com